# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.
दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur.dte.in@ gmail.com फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३

क्रमांक :- तंशिस/प्राकाना/शैवि-३/पदवी-पदविका /२०१३/ 2461
दिनांक:- 29 JUL 2013

प्रति,
संचालक/प्राचार्य
पदवी व पदव्युत्तर पदवी तसेच पदविका तस्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये / निकेतने तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करणेबाबत......

संदर्भ:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई,
यांचे पत्र क्रं. २/एनजीसी/ रिक्त जागा/८६३, दि. १२ जुलै २०१३.

उपरोक्त संदर्भाकित विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, अभियांत्रिकी महाविद्यालये / निकेतने तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी उपाययोजनांची अंमजबजावणी करणेबाबत संचालनालयाचे उपरोक्त संदर्भाकिंत पत्राची प्रत सोबत सलग्न करण्यांत येत आहे. त्यानुसार उपाययोजनाची अंमलबजावणी करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र:- वरीलप्रमाणे.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक: 2/एनजीसी/रिक्त जागा/ ८६३
दिनांक : 12 JUL 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर

विषय : राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये / निकेतने तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करणेबाबत......

महोदय,

राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी, एमबीए/एमएमस, एमसीए व पीजीडीएम या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेतील गेल्या 3-4 वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतची सांख्यकीय माहितीचा विचार केल्यास रिक्त राहणा-या जागांचे प्रमाण सतत वाढत आहे. सदरहु व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या रिक्त राहणा-या जागांची कारणमिमांसा विचारात घेतल्यास संबधित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेची गुणवत्ता हे एक प्रमुख कारण आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाचा दर्जा तथा गुणवत्तेत सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. तरी, आपल्या विभागाच्या कार्यकक्षेत येणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना त्यांच्या गुणवत्ते वाढ होण्यासाठी खालील उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास आपल्या स्तरावरुन निर्देशित करावे.

१. **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने निर्धारीत केलेल्या अर्हतेनसुार अध्यापकांच्या नियुक्त्या :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक असलेल्या अध्यापकांची परिषदेने निर्धारीत केलेल्या शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांची नियमित तत्वावर नियुक्ती करून विद्यापीठ तथा सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन मान्याताप्राप्त अध्यापकांची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

२. **अध्यापकांच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रम :**

संस्थेत कार्यरत असलेल्या अध्यापकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांची शैक्षणिक अर्हता वर्धीत करणे, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्य केलेले अल्पकालीन उजळणी वर्ग, पेपर सादरीकरण, विविध परिषदांना उपस्थित राहणे, परिसंवादात भाग घेण्यासाठी अध्यापकांना प्रोत्साहीत करावे. जेणेकरुन त्यांनी आत्मसात केलेले ज्ञान हे विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन केले जाऊन रोजगारक्षम मनुष्य बळ निर्माण होईल.

३. **व्हर्चुअल लर्निग पध्दतीचा अवंलब :**

विद्यार्थ्यांना विषयाबाबतचे अद्ययावत ज्ञान अनुभवी व उच्च विद्याविभुषित तज्ञ यांचेकडून करण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचे सहाय्य घेऊन जसे Video live / recorded telecast learning method [ Vertual learning System] इत्यादी पध्दतीचा अवलंब करुन उच्च विद्याविभुषित तज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावे.

४. **शैक्षणिक कर्ज योजनेस व्यापक प्रसिध्दी व संस्थास्तरावर त्यासाठी करावयाचे प्रयत्न:**

विना अनुदानित संस्थांचे विद्यार्थ्यांना न परवडणारे शैक्षणिक शुल्क या कारणामुळे सुध्दा रिक्त जागांच्या प्रमाणात वाढ झाल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज (विना-तारण) मिळण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व सहाय्यक संस्थास्तरावरुन करावे जेणेकरून शैक्षणिक शुल्काच्या कारणास्तव गरिब विद्यार्थ्यी शिक्षणापासून वंचीत राहणार नाही.

H:\vijay\kedare\vijay\35% vacancy.docx

५. **<u>विद्यार्थीहितास्तव असलेली माहिती संकेत स्थळी प्रसिध्द करणे :</u>**

संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी त्यांची अभ्यासक्रमनिहाय मंजूर क्षमता, झालेले प्रवेश, प्लेसमेंट, तक्रार निवारण कक्ष, महिला तक्रार निवारण कक्ष, अँटी कॅपिटेशन अ‍ॅक्ट, रॅगिंग इ. बाबतची अद्ययावत माहिती संकेतस्थळी प्रसिध्द करणे अनिवार्य राहील.

६. **<u>ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल कार्यक्षम करणे :</u>**

संस्थेतील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल द्वारे संस्था व स्थानिक तसेच संबंधित उद्योगधंदे यामध्ये समन्वय साधून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत. जेणेकरुन व्यावसायिक अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

७. **<u>उद्योगधंदे व संस्था समन्वय वाढविणे :-</u>**

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी उद्योगधंद्याशी समन्वय साधून प्रत्येक अध्यापकांस २ वर्षातून एकदा प्रशिक्षणास संबंधित उद्योगक्षेत्रात पाठविण्यात यावे. तसेच उद्योगाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना संबंधित उद्योगक्षेत्रात प्रशिक्षण देण्यात यावे. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यांच्या सहकार्याने संशोधन प्रकल्प [Industry Collabarative Research Projects] राबविणे, उद्योगधंदे व संस्थानी एकत्रित येऊन निरंतर शिक्षणासाठी सामजस्य करार [Industry and Institute MoU for Collabarative Continuous Education] करावे. जेणेकरून Live Case Studies / Project मुळे उद्योगजगतास आवश्यक असलेले गुणात्मक तांत्रिक मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होईल.

८. **<u>विद्यार्थ्यी वसतीगृह सुविधेत वाढ करणे :-</u>**

ग्रामीण भागातील संस्थामध्ये रिक्त जागां राहण्याचे प्रमाण पाहता, ग्रामीण भागातील संस्थांनी विद्यार्थी व विद्यार्थीनी करीता वसतीगृहाची सुविधा मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देणे अनिवार्य करण्यात यावे. परिणामी राज्यातील कोणत्याही ठिकाणी प्रवेश मिळाल्यास निवासस्थानाची सोय उपलब्ध करुन दिल्यास विद्यार्थ्यी व विद्यार्थ्यांनींच्या प्रवेश घेण्याच्या प्रमाणात वाढ होऊन रिक्त जागांचे प्रमाण कमी होईल.

९. **<u>एनबीए चे मानांकन :</u>**

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना एनबीएचे मानांकन करुन घेण्यात यावे. ज्या संस्थांनी एनबीए मानांकनाकरीता अर्ज केले असतील त्यांनी त्याचा पाठपुरावा करून मानांकन त्वरेने मिळविण्यासाठी जोमाने प्रयत्न करावे.

१०. **<u>शैक्षणिक स्वायत्तता प्रदान करणे :</u>**

एनबीए चे मानांकन प्राप्त संस्थांनी शैक्षणिक स्वायत्तता मिळविण्यासाठी प्रयत्न करावे. जेणेकरुन संबंधित क्षेत्रातील स्थानिक उद्योगजगताच्या तांत्रिक मनुष्यबळाच्या गरजेनुसार अभ्यासक्रम विकसित केले जाऊन उद्योगांना स्थानिक ठिकाणी रोजगानक्षम मुनष्यबळ उपलब्ध होईल तथा व्यावसायिक अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होईल.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यास आपल्या कार्यक्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाना कळविण्यात यावे. तसेच सदरहु संस्थानी वरील प्रमाणे मुद्येनिहाय केलेल्या कार्यवाहीचा सर्व संस्थाचा एकत्रित कार्यपालन अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

1) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400 032 यांना माहितीसाठी सादर
2) कार्यासन क्रमांक 10, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.